पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.
मा. क्रीडा समिती
कार्यपत्रिका क्रमांक - **१६**

**सभावृत्तांत**

दिनांक - **०६/०५/२०१५** वेळ - दुपारी **२.००** वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा. क्रीडा समितीची पाक्षिक सभा बुधवार दिनांक **०६/०५/२०१५** रोजी दुपारी **२.००** वाजता महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

**१)** मा. तानाजी विठ्ठल खाडे
**२)** मा. गिता सुशिल मंचरकर

या शिवाय मा.उल्हास जगताप – नगरसचिव, हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

सभा कामकाजाचेवेळी सभाकामकाज उरकणेसाठी आवश्यक गणसंख्या सभागृहात नसलेने उपस्थित सन्मा.सदस्य यांनी गुरुवार दिनांक ०७/०५/२०१५ रोजी दुपारी २.०० वा.पर्यंत सभा तहकूब केली.

**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

मा. क्रीडा समिति

कार्यपत्रिका क्रमांक - **१६**

**सभावृत्तांत**

( दिनांक ०६/०५/२०१५ ची तहकूब सभा )

दिनांक - **०७/०५/२०१५** वेळ - दुपारी **२.००** वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा. क्रीडा समितीची दिनांक ०६/०५/२०१५ ची तहकूब सभा गुरुवार दिनांक **०७/०५/२०१५** रोजी दुपारी **२.००** वाजता महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

**१) मा. ननवरे जितेंद्र बाबा - सभापती**
२) मा. तानाजी विठ्ठल खाडे
३) मा. मोटे किरण बाळासाहेब
४) मा. सौ.साळुंके सविता सुरेश
५) मा. बारणे निलेश हिरामण

या शिवाय मा.फुंदे – सहा.आयुक्त, मा.उल्हास जगताप – नगरसचिव, मा.बेंडे – प्रशासन अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

दिनांक १५/०४/२०१५ रोजी झालेल्या सभेचा **(कार्यपत्रिका क्र.१५)** चा सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

---------

ठराव क्रमांक – ९५ विषय क्रमांक - १
दिनांक - ०७/०५/२०१५ विभाग - क्रीडा
सुचक - मा.तानाजी खाडे अनुमोदक – मा.निलेश बारणे
संदर्भ - मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.क्रीडा/७अ/कावि/३५१/२०१५, दि.०७/०४/२०१५

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

ई निविदा क्र.१/९/२०१३-१४ मोहननगर, जलतरण तलाव पाणी शुध्दीकरण, परिसर स्वच्छता, साफसफाई व यांत्रिक देखभाल दुरुस्ती कामासाठी प्राप्त झालेले फर्स्ट लोएस्ट ठेकेदार (ओंकार इंजिनिअरींग) २ वर्षाचे लघुत्तम दरानुसार पहिल्या वर्षाचा दरमहा दर र.रु.१,११,६००/-

या दराने १२ महिने कामासाठी येणारा खर्च र.रु.१३,३९,२००/- तसेच दुस-या वर्षाचा दरमहा दर र.रु.१,२०,९००/- या दराने १२ महिने कामासाठी येणारा खर्च र.रु.१४,५०,८००/- एकूण र.रु.२७,९०,०००/- चे कामकाज सेकंड लोएस्ट ठेकेदार मे.वरदायिनी एन्टर प्राईजेस, चिंचवड पुणे ३३ यांचेकडून करारनामा करुन २ वर्षाचे कामाचे आदेश देणेकामी व येणा-या खर्चास मान्यता देणेकामी मा.स्थायी समितीसभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समितीकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ९६ विषय क्रमांक - २

दिनांक - ०७/०५/२०१५ विभाग - क्रीडा

सुचक - मा.निलेश बारणे अनुमोदक – मा.सविता साळुंके

संदर्भ - मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.क्रीडा/०६/कावि/२२१/२०१५, दि.१५/०४/२०१५

विषय - म.न.पा.चा इंद्रायणीनगर से.नं.०१ भोसरी येथील बॅडमिंटन हॉल राष्ट्रीय ग्रामिण विकास केंद्र, पुणे ०६ यांना ११ महिने भाडे कराराने चालविण्यास देणेबाबत...

विषय क्रमांक २ चा विचार दिनांक १९/०८/२०१५ चे सभेत करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ९७ विषय क्रमांक - ३

दिनांक - ०७/०५/२०१५ विभाग - क्रीडा

सुचक - मा.तानाजी खाडे अनुमोदक – मा.निलेश बारणे

संदर्भ - मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.क्रीडा/७अ/कावि/३७६/२०१५, दि.२७/०४/२०१५

मा.महापालिका आयुक्त यांची शिफारस विचारात घेऊन -

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्यावतीने मनपा परिसरातील उदयोन्मुख खेळाडूंच्या सुप्त गुणांना वाव देण्याच्या उद्देशाने क्रिकेट, अथलेटिक्स, बॉक्सिंग, हॉकी, नेमबाजी, फुटबॉल, सॉफ्टबॉल इ. खेळांचे १० ते १५ वर्षे या वयोगटातील एकूण ४०० विद्यार्थ्यांकरिता उन्हाळी प्रशिक्षण शिबीर " दिनांक ११ मे २०१५ ते २५ मे २०१५ अखेर १५ दिवस " अशी मा.आयुक्त यांची मागणी असली तरी माहे " मे २०१५ मध्ये १५ दिवस " अशी दुरुस्ती करणेत येत असून कै.अण्णासाहेब मगर स्टेडियम, नेहरुनगर व श्री संत ज्ञानेश्वर क्रीडा संकुल, इंद्रायणीनगर, भोसरी येथे आयोजित करणेस व त्याकामी येणारे र.रु.३,२५,०००/- (अक्षरी र.रु.तीन लाख पंचवीस हजार फक्त) चे खर्चास मान्यता व सदरचा खर्च क्रीडा निधी, क्रीडा शिक्षण शिबीर या लेखाशिर्षावर सन २०१५-१६ करिता केलेल्या र.रु.५,००,०००/- मधून खर्ची टाकणेस मान्यता देणेकामी मा.स्थायी समितीसभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समितीकडे पाठविणेत यावा.

| अ.क्र. | खर्चाचा तपशिल | रक्कम रुपये |
| --- | --- | --- |
| १ | खेळाडू अल्पोपहार खर्च<br>४०० खेळाडू x र.रु.५०/- x १५ =३,००,०००/- | ३,००,०००/- |
| २ | क्रीडा व्याख्याते मानधन<br>प्रतिदिनी र.रु.१०००/- x १५ = १५,०००/- | १५,०००/- |
| ३ | शिबीर उदघाटन व समारोप बुके खर्च<br>१५ x १०० x २ दिवस =३,०००/- | ३,०००/- |
| ४ | शिबीर उदघाटन व समारोप बुके खर्च<br>५० x १० x २ दिवस =२,०००/- | २,०००/- |
| ५ | शिबीर अनुषंगाने किरकोळ खर्च र.रु. | ५,०००/- |
| | **एकूण खर्च र.रु.** | **३,२५,०००/-** |

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – ९८ विषय क्रमांक - ४

दिनांक - ०७/०५/२०१५ विभाग - क्रीडा

सुचक - मा.सविता साळुंके अनुमोदक – मा.तानाजी खाडे

संदर्भ - मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.क्रीडा/८/कावि/४२/२०१५, दि.२७/०४/२०१५

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

महापालिकेचे क्रीडा धोरणातील भाग १ ड शिष्यवृत्ती मधील ३ पान क्रमांक १८ प्रमाणे आंतरराष्ट्रीय स्तरांवरील खेळाडूंना आर्थिक सहाय्य करणे यामध्ये नमुद केलेप्रमाणे **कु.नुपुर लक्ष्मण मोरे** हिची बँकॉक थायलॅड येथे दिनांक १९/०६/२०१५ ते २१/०६/२०१५ रोजी होणा-या इंटरनॅशनल योगासन ५ व्या योगासन स्पोर्टस चॅम्पियनशिपकरीता योगा फेडरेशन ऑफ इंडिया या संस्थेच्यावतीने निवड झाली असल्यामुळे सदर स्पर्धेसाठी उपस्थित राहणेकामी र.रु.४१,२५०/- ( अक्षरी र.रु.एक्केचाळीस हजार दोनशे पन्नास फक्त) आर्थिक सहाय्य अदा करणेस मान्यता देणेकामी मा.स्थायी समितीसभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समितीकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ९९ विषय क्रमांक - ५

दिनांक - ०७/०५/२०१५ विभाग - क्रीडा

सुचक - मा.तानाजी खाडे अनुमोदक – मा.सविता साळुंके

संदर्भ - मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.क्रीडा/८/कावि/४३/२०१५, दि.२७/०४/२०१५

मा.महापालिका आयुक्त यांची शिफारस विचारात घेऊन -

महापालिकेचे क्रीडा धोरणातील भाग १ ड शिष्यवृत्ती मधील ३ पान क्रमांक १८ प्रमाणे आंतरराष्ट्रीय स्तरांवरील खेळाडूंना आर्थिक सहाय्य करणे यामध्ये नमुद केलेप्रमाणे **कु.स्वरदा कुमार देशपांडे** हिची बँकॉक थायलँड येथे दिनांक १९/०६/२०१५ ते २१/०६/२०१५ रोजी होणा-या इंटरनॅशनल योगासन ५ व्या योगासन स्पोर्टस चॅम्पियनशिपकरीता योगा फेडरेशन ऑफ इंडिया या संस्थेच्यावतीने निवड झाली असल्यामुळे सदर स्पर्धेसाठी उपस्थित राहणेकामी र.रु.४१,२५०/- ( अक्षरी र.रु.एक्केचाळीस हजार दोनशे पन्नास फक्त) आर्थिक सहाय्य अदा करणेस मान्यता देणेत येत आहे. तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मेजर ध्यानचंद हॉकी स्टेडियम मधील गॅलरीला १९३६ च्या बर्लिन ऑलम्पिक मध्ये मेजर ध्यानचंद यांच्या सुवर्ण पदक विजेत्या हॉकी संघात सदस्य असणा-या बाबु निमल, ज्यु फीलिप व २००४ मध्ये ऑलम्पिक मध्ये सहभागी असणारे विक्रम पिल्ले व मुख्य गॅलरीला भारतीय हॉकी संघाचे माजी कर्णधार चार वेळा व ऑलम्पिक वर्ल्डकप चॅम्पियन्स ट्रॉफी आशियाई सुवर्ण पदक विजेते असणारे राजीव गांधी खेलरत्न पुरस्कार प्राप्त धनराज पिल्ले यांचे नाव गॅलरीला देणेस मान्यता देणेत येत आहे. तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या हद्दीतील खेळाडूंच्या क्रीडा गुणांना वाव मिळावा व गुणवत्ता वाढ व्हावी या अनुषंगाने शहरातील उत्कृष्ठ खेळाडूंना वर्षामध्ये राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय स्तरावर नाव गाजवणा-या पुरुष, महिला यांना खाशाबा जाधव पुरस्कार व ११,०००/- व मार्गदर्शक / प्रशिक्षक / क्रीडा संघटक यांना गुरुवर्य पुरस्कार व ५,०००/- अशा पध्दतीने प्रत्येक वर्षी होणा-या खर्चास प्रशासकीय मान्यता देणेकामी मा.स्थायी समितीसभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समितीकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – १०० विषय क्रमांक - ६

दिनांक - ०७/०५/२०१५ विभाग - क्रीडा

सुचक - मा.तानाजी खाडे अनुमोदक – मा.सविता साळुंके

संदर्भ - मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.क्रीडा/४/कावि/२०/२०१५, दि.२८/०४/२०१५

मा.महापालिका आयुक्त यांची शिफारस विचारात घेऊन -

अ.क्र.१) वैदुवस्ती व्यायामशाळा, पिंपळे गुरव, २) बळवंत चिंचवडे व्यायामशाळा, चिंचवड व ३) मुंजोबा चौक पिंपळे सौदागर या व्यायामशाळा वगळता उर्वरित प्रस्तावात नमुद तक्त्यातील क्र.१ ते २८ व्यायामशाळांना दि.०१ डिसेंबर २०१३ ते दि.३१ ऑक्टोंबर २०१४ अखेर

सेवाशुल्क देऊन म.न.पा.व्यायामशाळा कराराने चालविणेस देणेस मान्यता देणेत येत आहे. तथापि एकूण २८ व्यायामशाळांची मुदत ३१ ऑक्टोंबर २०१४ अखेर संपलेली असल्याने दिनांक १ डिसेंबर २०१३ ते ३१ ऑक्टोंबर २०१४ अखेर सेवाशुल्क देऊन मनपा व्यायामशाळा कराराने चालविणेस देणेस व त्यानंतर दिनांक १ नोव्हेंबर २०१४ ते ३० जून २०१५ अखेर ११ महिनेसाठी सेवाशुल्क देऊन व्यायामशाळा चालविणेस देणेस मान्यता देणेकामी मा.स्थायी समितीसभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समितीकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

**( ननवरे जितेंद्र बाबा )**
**सभापती**
क्रीडा समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/ ३६९ /२०१५
दिनांक : ११/०५/२०१५

**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८.

प्रत : सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.